**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. सुधीर माधव जोशी
५८७, दत्तप्रसाद सोसायटी,
पुणे-सिंहगड रोड, पुणे -३० **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी**
महिला सेवा मंडळ ट्रस्ट,
कुसुमताई मोतीचंद महिला सेवाग्राम,
कर्वे रोड, पुणे -४ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
महिला सेवा मंडळ ट्रस्ट,
कुसुमताई मोतीचंद महिला सेवाग्राम,
कर्वे रोड, पुणे -४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१५०/पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७/३/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६/५/२००८ |
| ४ | **मूळ माहिती अर्जान्वये केलेली मागणी :-** महिला सेवा मंडळ ट्रस्टच्या जागेसंदर्भातील माहिती | |

**विवेचन**

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण'

ठरते, याचे कोणतेही पुरावे अपीलकर्ता श्री. सुधीर माधव जोशी यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 26 FEB 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. संपत माधव त्रिभूवन
भिमार्थ इंगळे नगर,
सिध्दार्थ कॉलनी, वारजे नाका,
पुणे -५२

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण अधिकारी,** **उत्तरवादी**
शिक्षण संचालनालय (प्राथमिक),
पुणे

**जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षण अधिकारी,**
शिक्षण संचालनालय (प्राथमिक),
पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२२१/पुणे |
| २ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र 'अ ') छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपिलकर्ता श्री. संपत माधव त्रिभूवन यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, जन माहिती अधिकारी यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 26 FEB 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.पांडुरंग शेषाराव शिंदे
१७/१, जय मल्हार चौक एस.टी.डेपोमागे, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष पोलीस महानिरीक्षक,
कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक (वाचक),
कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.५.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.पांडुरंग शेषाराव शिंदे
१७/१, जय मल्हार चौक एस.टी.डेपोमागे, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक (वाचक),
कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर श्री.हंबीरराव शामराव महाडीक

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.११.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.१२.२००६ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.७.५.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील सहाय्यक पोलीस निरीक्षकांबद्दलची माहिती मागितली होती. ती अचूक दिली गेली नाही. तसेच रहिवासाचा खोटा दाखला दिल्याबाबतची माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.पांडुरंग शेषाराव शिंदे यांनी केली.

श्री.शिंदे यांनी मागितलेली माहिती पोलीस अधीक्षक, ग्रामीण कार्यालयाशी संबंधित असल्याने अर्ज त्यांच्याकडे पाठविण्यात आला व त्यांनी विहित मुदतीत श्री.शिंदे यांना माहिती दिली. परंतु पूर्ण माहिती न मिळाल्याच्या कारणावरून श्री.शिंदे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत योग्य माहिती देण्यात आली असल्याचा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर यांनी दिला. या अधिनियमाच्या कलम २(च) मध्ये 'माहिती'ची व्याख्या नमूद केली असून श्री.शिंदे यांनी केलेली विचारणा त्या संज्ञेत बसत नाही. तसेच सोलापूर जिल्ह्यात नेमणुकीस असलेल्या एका उपविभागीय पोलीस अधिकाऱ्याने रहिवासी असल्याचा खोटा दाखला दिला, त्याची खातरजमा करून माहिती द्यावी, अशा स्वरूपाची विचारणा केली आहे. 'माहिती'च्या व्याख्येत अशा विचारणेचा समावेश होत नाही. तरीही त्यांच्या अर्जातील मुद्दयांबाबतच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती त्यांना देण्यात आल्या, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा

पोलीस उपअधीक्षक(वाचक), कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर श्री.बी.एस.तांगडे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. त्यांचे निवेदन रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६.२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शाहीद रझा बुर्नी
डी/३, अमर क्लासिक, हडपसर, पुणे -२८ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३३४/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.२.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती सीमा होळकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.५.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१८.६.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.११.७.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१८.८.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१६.२.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण मागितलेली माहिती मिळाली असल्यामुळे, अपील मागे घेत असल्याचे अपीलकर्ता श्री.शाहीद रझा बर्नी यांनी दि.१६.२.२०१० च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६ .२.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.अविनाश ब. मोहिते
सौजन्य निवास, सर्व्हे नं.६९०/५,
भारतमाता चौक, गव्हाणे वस्ती,
भोसरी, पुणे ४११ ०३९

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप सचिव,
राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र, पुणे खंडपीठ, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र, पुणे खंडपीठ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३५५/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.३.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२.४.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.४.२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१६.६.२००८ |
| ६ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.अविनाश ब. मोहिते यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**स्थळ : पुणे**
**दिनांक :** 26 FEB 2010

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

मा.राज्य माहिती आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार उचित कार्यवाही करुन त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगाकडे विहित मुदतीत पाठवावा.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. विकास अशोक काळभोर
आविद हौसिंग सोसायटी, ३रा मजला, विठ्ठल
मंदिरामागे, विठ्ठलवाडी, आकुर्डी, पुणे-३५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी क्र.२, पिंपरी चिंचवड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४०८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** — श्री. विकास अशोक काळभोर<br>आविद हौसिंग सोसायटी, ३रा मजला,<br>विठ्ठल मंदिरामागे, विठ्ठलवाडी, आकुर्डी, पुणे-३५<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा — नगर भूमापन अधिकारी क्र.२, पिंपरी चिंचवड, पुणे<br>श्री. इंद्रसेन तुकाराम लांडे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.८.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मौजे आकुर्डी गावातील एका भूखंडाच्या संदर्भातील दि. २४.५.१९९४ रोजीच्या आदेशाची प्रत व त्या संदर्भातील माहिती वारंवार मागणी करूनही जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.२, पिंपरी चिंचवड, पुणे यांच्याकडून दिली जात नाही. आपण १०० टक्के अपंग आहोत. संबंधित भूखंडाबाबतची माहिती न मिळाल्यास आपल्या कुटुंबाचे अपरिमित नुकसान होणार आहे. या प्रकरणात अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे यांच्यासमोर चालू असलेल्या दाव्यात मालकी हक्काचा पुरावा म्हणून ही माहिती आवश्यक आहे. परंतु भूमि अभिलेख खात्यातील काही अधिकाऱ्यांनी आपल्या विरोधातील पक्षकारांना मदत करण्यासाठी कागदपत्र गहाळ केली असल्याचा आपल्याला संशय आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. विकास अशोक काळभोर यांनी केले.

संबंधित धारिका अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे यांच्या कार्यालयात सादर केली होती, ती अद्याप आपल्याकडे प्राप्त झालेली नाही. या प्रकरणातील तीनपैकी दोन धारिका आल्या, एक धारिका प्राप्त झालेली नाही. ही 'ब' वर्गातील कागदपत्रे असून जतनाचा कालावधी तीस वर्षे आहे. जाणीवपूर्वक माहिती नाकारण्याचा अथवा कोणत्याही पक्षकाराला मदत करण्याचा अधिकाऱ्यांचा उद्देश नाही. अभिलेखात सखोल शोध घेऊनही ही धारिका आढळत नाही. धारिकांचा सखोल शोध घेण्याबाबत आपल्या कार्यालयातील अभिलेखपाल, शिपाई, परिरक्षण भूमापक यांना दि. २३.५.२००८ रोजी लेखी समज दिली होती. त्यांनी धारिका आढळत नसल्याचा खुलासा केल्यानंतर पुन्हा दि. ४.४.२००९ रोजी त्यांना समज देण्यात आली व संबंधित परिरक्षण भूमापक व अभिलेखपाल यांच्यावर शिस्तभंग कारवाई प्रस्तावित केली आहे, असेही तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड, पिंपरी, पुणे श्री. इंद्रसेन तुकाराम लांडे यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे.

एका प्रकरणातील तीनपैकी दोन धारिका उपलब्ध होतात व एक धारिका उपलब्ध होत नाही. 'ब' वर्गातील कागदपत्रे असूनही जतनाच्या कालावधीनुसार जतन केलेले नाही, ही बाब गंभीर आहे. एक आठवड्यात संबंधित धारिकांचा शोध घ्यावा व न आढळल्यास जतनाची जबाबदारी असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ नुसार

फौजदारी गुन्हा नोंदवावा. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे यांनी ही कार्यवाही करून अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.२, पिंपरी चिंचवड, पिंपरी, पुणे यांनी दि. १८.८.२००९ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला. संबंधित धारिका दि. २५.५.२००० च्या पत्रान्वये अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे या कार्यालयात सादर केलेल्या आहेत. संबंधित अपिलाचा निर्णय दि. २८.४.२००५ रोजी झाला, परंतु धारिका आपल्या कार्यालयाकडे परत आलेली नाही. आपल्या कार्यालयात, तसेच अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे कार्यालयात सखोल शोध घेऊनही सदर धारिका आढळून आली नाही, असे त्यांनी प्रमुख लिपिक, परिरक्षण भूमापक क्र.३, अभिलेखपाल यांना दिलेले ज्ञापन व त्यांचा खुलासा यांच्या प्रतींसह नमूद केले आहे. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे यांनी दि. ३१.८.२००९ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला असून संबंधित धारिकांचा शोध घेण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशील नमूद केला आहे. 'एखादा अभिलेख उपलब्ध होत नसल्यास अन्य दस्त / वा सहाय्यक / पूरक कागदपत्रे आणि जागेवरील प्रत्यक्ष ताबा, वस्तुस्थिती विचारात घेऊन फाळणी व हद्दकायम मोजणी नकाशा / अभिलेख तयार करून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या तरतुदींचा अवलंब करून ( उदा. अपील, फेरतपासणी इ.) पुरविता येऊ शकतात. त्यासाठी अर्जदार यांनी शासकीय कार्यपध्दती अवलंबून सहकार्य अपेक्षित आहे,' असेही या अहवालात म्हटले आहे. संबंधित मूळ प्रकरणातील अपील अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे यांच्याच कक्षेतील असून वरील बाबी ते लक्षात घेऊ शकतात व अपीलकर्त्यास योग्य मार्गदर्शन करू शकतात. मात्र जतनाच्या कालावधीनुसार कागदपत्रे जतन न करण्याची गंभीर कृती त्यामुळे क्षम्य ठरत नाही. म्हणून संबंधित अभिलेखाची त्या त्या वेळी जबाबदारी असणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचा याबाबत खुलासा घेऊन संचिका गहाळ होण्याच्या प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता श्री. विकास अशोक काळभोर यांनी मागणी केलेल्या व अभिलेखाच्या वर्गीकरणानुसार 'ब' वर्गातील कालावधीनुसार कागदपत्रे जतन करण्याची जबाबदारी असणाऱ्या सन १९९४ पासूनच्या कर्मचाऱ्यांचा खुलासा प्राप्त करून घेऊन व संबंधित धारिकांचा सखोल शोध घेऊन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे यांनी दि. २५.३.२०१० पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा. संबंधित संचिका त्यानंतरही आढळ न झाल्यास त्याबाबतची जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये फौजदारी गुन्हा नोंदवावा.

**पुणे**
**दि. ०९ .२.२०१०**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शहाजी रामदास भगत
कार्यकारी संचालक, श्री सोमेश्वर सहकारी साखर
कारखाना लि.सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर),
पुणे विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक, श्री सोमेश्वर सहकारी साखर
कारखाना लि.सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४६८ / पुणे /२००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शहाजी रामदास भगत
कार्यकारी संचालक, श्री सोमेश्वर सहकारी साखर
कारखाना लि.सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर),
पुणे विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे प्रतिनिधी श्री.बी.जे.देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक, श्री सोमेश्वर सहकारी साखर
कारखाना लि.सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे श्री.शहाजी रामदास भगत

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.५.२००८ व ११.५.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.७.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२७.६.२००८, ३०.६.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.१२.२००८, २२.८.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२०.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.२.२०१० रोजी घेण्यात आली.

अर्जदार श्री.सतीश शिवाजीराव काकडे यांनी विस्तृत माहितीची मागणी केली होती. त्यासाठी रूपये ५३२४ एवढे शुल्क भरण्यास आपण त्यांना कळविले. परंतु त्यांनी शुल्क भरले नाही, म्हणून माहिती देता आली नाही. श्री.काकडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), पुणे विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांच्याकडे अपील केले. ५६४ रूपये शुल्क श्री.काकडे यानी भरावे व शुल्क भरल्यानंतर जन माहिती अधिकारी म्हणून आपण माहिती द्यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), पुणे विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी दिला. माहिती नाकारलेली नसताना व अर्जदाराने शुल्क भरले नसताना दिलेला हा निर्णय रद्द करावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री.शहाजी रामदास भगत यांनी केली.

जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविलेले शुल्क अवाजवी असल्याचे प्रतिपादन अर्जदार श्री.सतीश शिवाजीराव काकडे यानी केले होते. अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), पुणे विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी शुल्क आकारणीचा जन माहिती अधिकाऱ्यानी दिलेला तपशील तपासून ५३२४ रूपयांपैकी ५६४ रूपये शुल्क योग्य

असल्याचा निर्णय दिला, असे अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), पुणे विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.बी.जे.देशमुख यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि., सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे श्री.शहाजी रामदास भगत यानी नमूद केलेला शुल्काचा तपशील पाहता लिपिक व शिपाई यांच्या कामापोटी ४७६० रूपये शुल्क कळविले आहे व छायांकित प्रती व टंकलिखित माहिती यासाठी ५६४ रूपये शुल्क नमूद केले आहे. कर्मचाऱ्यांच्या पगाराची शुल्क म्हणून मागणी करणे योग्य नाही. त्यामुळे रू.५६४ शुल्क आकारण्याचा अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), पुणे विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी दिलेला निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक(साखर), पुणे विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी रू.५६४ शुल्क आकारून माहिती देण्याचा प्रथम अपिलात दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२६.२.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. भाऊसाहेब धोंडीबा गावडे
मु. पो. केंदूर, ता. शिरुर,
जि. पुणे

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,**
जिल्हा परिषद, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय,
जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५०४/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/२/२०१० |
| ३ | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी**<br>जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय<br>जिल्हा परिषद, पुणे<br>प्रतिनिधी - श्री. व्ही .एस.गोडे, कार्यालय अधीक्षक | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३/७/२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१/७/२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९/८/२००८ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>मूळ माहिती - मागणी अर्ज (जोडपत्र 'अ' ) ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

'आपणास आवश्यक असणारी माहिती प्राप्त झालेली असल्याने अपिलावर सुनावणीची आवश्यकता नाही,' असे अपीलकर्ता श्री. भाऊसाहेब धोंडीबा गावडे यांचे लेखी निवेदन दि. १७/२/२०१० रोजी सुनावणीच्या वेळी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 25 FEB 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.एम.एच.खोत
सरपंच ग्रामपंचायत कणसेवाडी,
ता.खटाव, जि.कोल्हापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी (वर्ग-१)
पंचायत समिती खटाव (वडूज),
ता.खटाव, जि.सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम,उप विभाग वडूज,
ता.खटाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६३/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री.एम.एच.खोत<br>सरपंच ग्रामपंचायत कणसेवाडी,<br>ता.खटाव, जि.कोल्हापूर<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी (वर्ग-१)<br>पंचायत समिती खटाव (वडूज),<br>ता.खटाव, जि.सातारा श्रीमती आय. व्हि. कोळी तर्फे श्री.अमोल वसंत कांबळे<br>**जन माहिती अधिकारी तथा** उप अभियंता,<br>जिल्हा परिषद बांधकाम, उप विभाग वडूज,<br>ता.खटाव, जि.सातारा श्री.कुमार तुकाराम पाटील | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१८.१०.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१४.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.६.१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२८.२.२००९ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण दि.१८.१०.२००८ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती प्रथम अपील केल्यानंतर दि.५.०२.२००९ रोजी दिली. आधी रु.४४/- शुल्क भरण्यास कळविले होते. त्यानुसार शुल्क भरल्यानंतर माहिती दिली नाही. निःशुल्क माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिल्यानंतरही शुल्क परत दिले नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.एम.एच.खोत यांनी केली.

श्री.खोत यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांना शुल्क कळविण्यास ६ दिवस विलंब झाला. त्यांनी शुल्क भरल्यानंतर एक महिन्याने पोच देय डाकेने माहिती पाठविली. या काळातील कामाच्या ताणामुळे माहिती देण्यास विलंब झाला. माहितीच्या अधिकारात माहिती देण्यास विलंब झालेले हे पाहिलेच प्रकरण असून हेतूतः माहिती नाकारलेली नाही. दंड क्षमापित करावा, अशी विनंती जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम, उप विभाग वडूज,ता.खटाव, जि.सातारा श्री.कुमार तुकाराम पाटील यांनी लेखी निवेदनाद्वारे केली असून त्यांचे प्रतिनिधी श्री. अमोल वसंत कांबळे यांनी त्याचा पुनरूच्चार केला.

अपीलकर्त्यास केलेल्या पत्रव्यवहाराच्या जावक बारनिशीच्या नोंदींच्या प्रती,तत्कालीन कामाच्या ताणाचा तपशील जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,जिल्हा परिषद बांधकाम, उप विभाग वडूज,ता.खटाव, जि.सातारा श्री.कुमार तुकाराम पाटील यांनी आयोगाला सादर करावा व अपीलकर्त्याकडून स्वीकारलेले शुल्क रु.४४/- जन माहिती अधिकारी श्री.कुमार तुकाराम पाटील यांनी स्वखर्चातून परत करावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,जिल्हा परिषद बांधकाम, उप विभाग वडूज,ता.खटाव, जि.सातारा श्री.कुमार तुकाराम पाटील यांनी पूर्तता केल्याचे दि.२३.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. तथापि विलंबाची त्यांनी दिलेली कारणे समर्थनीय नाहीत. कामाच्या व्यापामुळे माहिती देण्यास विलंब झाला, हे समर्थन मान्य करता येणार नाही. त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य.

२. अपीलकर्त्याच्या दि.१४.१०.२००८ च्या अर्जानुसार जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम, उप विभाग वडूज,ता.खटाव, जि.सातारा श्री.कुमार तुकाराम पाटील यांनी दि.०१.०१.२००९ रोजी माहिती दिली आहे. शुल्क कळविण्यास झालेला विलंब क्षमापित केला तरी अपीलकर्त्याने दि.१.१२.२००८ रोजी शुल्क भरल्यानंतर माहिती त्वरित न देता ३० दिवसांनी दिली आहे. या कालावधीसाठी जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम, उप विभाग वडूज,ता.खटाव, जि.सातारा श्री.कुमार तुकाराम पाटील यांना (३० दिवस x रु. २५०/-) रु.७,५००/- शास्ती करण्यात येत आहे. सदरची शास्तीची रक्कम एप्रिल,मे व जून २०१० मध्ये देय असणाऱ्या मार्च, एप्रिल व मे २०१० च्या वेतनातून तीन समान हप्त्यात वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१),पंचायत समिती खटाव (वडूज),ता.खटाव, जि.सातारा श्रीमती आय. व्हि. कोळी यांनी करुन, याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

स्थळ : पुणे
दि. 26 FEB 2010

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

ॲड. सचिन स. पळसे
ॲड. अजय विजय पाटील
१/१६, स्वारगेट पोलीस लाईन, पुणे-४२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग प्रमुख, पाणीपुरवठा विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६३१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | ॲड. सचिन स. पळसे<br>ॲड. अजय विजय पाटील<br>१/१६, स्वारगेट पोलीस लाईन, पुणे-४२ |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | विभाग प्रमुख, पाणीपुरवठा विभाग,<br>पुणे महानगरपालिका, पुणे<br>श्री. प्रमोद शंकर निरभवणे |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | नगर उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग,<br>पुणे महानगरपालिका, पुणे<br>श्री. सतिशचंद्र लक्ष्मण घुमे |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.१०.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

पुणे महानगरपालिकेच्या धनकवडी क्षेत्रिय कार्यालयातंर्गत येणाऱ्या परिसरातील पाण्याचे वॉल्व सोडण्याचे काम असणाऱ्या ठेकेदारांकडील कामगारांच्या संदर्भातील सन २००१ ते २००९ या काळातील माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, पाणी पुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे मागितली होती. एक महिन्याची मुदत मागूनही जन माहिती अधिकाऱ्यांनी अपुरी माहिती दिली. म्हणून अपिलीय प्राधिकारी तथा विभाग प्रमुख, पाणी पुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे अपील केले. राहिलेली माहिती पंधरा दिवसांत देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यांनी दिले. परंतु कामगारांचे हजेरी पत्रक, ठेकेदारांच्या ठराविक कालावधीच्या कामाची कागदपत्रे, कामगारांचे भविष्य निर्वाह निधी, वेतन पुस्तिका आदी माहिती दिली नाही. सन २००१ ते २००९ पर्यंत सर्व कामगार पूर्वीपासूनचे असून कोणाचीही बदली झालेली नाही, हे लक्षात घेता वेतन पुस्तिकेसह परिपूर्ण माहिती द्यावी, अशी मागणी अपीलकर्ता ॲड. अजय विजय पाटील यांनी केली. आपल्याला न्यायालयीन कामकाजाकरिता ही माहिती हवी असून ती संकलित करण्यासाठी मुदत मागण्याची जन माहिती अधिकाऱ्यांची कृती अयोग्य आहे. वस्तुत: किमान वेतन कायदा, भविष्य निर्वाह निधी कायदा इ. कायद्यानुसार सदर माहिती ठेवण्याचे बंधन मालकावर असते व महानगरपालिका कायद्यातील तरतुदीनुसार अशी कायदेशीर कागदपत्रे ठेवण्याची जबाबदारी 'मूळ मालक' म्हणून महानगरपालिकेची असते. त्यामुळे ही माहिती तयार असणे आवश्यक व अपेक्षित आहे, असेही प्रतिपादन ॲड. सचिन पळसे व ॲड. अजय विजय पाटील यांनी केले.

अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती आठ वर्षांच्या काळातील व विस्तृत अशी असून क्षेत्रिय कार्यालयाकडील आहे. त्यामुळे ती देण्यास अधिक मुदतीची विनंती केली. सन २००३ मधील माहिती उपलब्ध नसल्यामुळे देता आली नाही. तसेच ठेकेदारांकडील कामगारांची नावे,

वय, पत्ता याची माहिती व वेतन पुस्तिका ही माहिती ठेकेदारांकडे असते, त्यांच्याकडून मागणी करण्यात आली व उपलब्ध झालेली सर्व माहिती अपीलकर्त्यांना दिली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, पाणी पुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. सतिशचंद्र लक्ष्मण घुमे व अपिलीय प्राधिकारी तथा विभाग प्रमुख, पाणी पुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. प्रमोद शंकर निरभवणे यांनी केले.

कामगारांना द्यावयाच्या कायदेशीर लाभापासून कायदेविषयक कार्यवाहीची अंतिम जबाबदारी 'मूळ मालक' म्हणून महानगरपालिकेची आहे. ठेकेदारांकडून ही माहिती प्राप्त करून न घेतल्यास संबंधित अधिकारी जबाबदार ठरू शकतात. अशी माहिती न देणाऱ्या ठेकेदारांबाबत कोणती कारवाई केली जाणार, हे महानगरपालिकेच्या संबंधित विभागाने स्पष्ट करणे आवश्यक आहे. ठेकेदारांबाबतचा तपशील, कामगारांच्या वेतनविषयक माहिती आदीसह अपीलकर्त्याच्या मूळ अर्जानुसार द्यावयाची राहिलेली माहिती देण्याबाबत कार्यवाही करून जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १३.८.२००९ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा विभाग प्रमुख, पाणीपुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. प्रमोद शंकर निरभवणे यांनी दि. १३.८.२००९ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या माहितीच्या प्रतीसह अहवाल सादर केला. ठेकेदारांची नावे व पत्ते आदी तपशील, हजेरी पत्रक, करार, निविदा आदींच्या प्रती ही माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली. वेतन पुस्तिका, राज्य कामगार विमा योजना व भविष्य निर्वाह निधी याबाबतची माहिती उपलब्ध न झाल्यामुळे देता आलेली नाही. खात्याकडे उपलब्ध असलेली माहिती सांक्षाकित करून देण्यात आली आहे, असे या अहवालात नमूद केले आहे. तसेच पाणी पुरवठा सेवा ही तातडीची अत्यावश्यक असून ठेकेदारी सेवकांना योग्य तो न्याय देण्यासाठी जरूर ती कार्यवाही करण्यात येत आहे, असेही अहवालात म्हटले आहे. मात्र वेतन पुस्तिका, रजा, कामगार विमा योजना व भविष्य निर्वाह निधी याबाबतची माहिती महानगरपालिकेकडे असणे आवश्यक आहे. संबंधित ठेकेदारांकडून ही माहिती प्राप्त होत नसल्यास ठेकेदारावर व याबाबतची कायदेशीर पूर्तता करून घेण्याची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार हे स्पष्ट होणे सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेच्या व सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही आवश्यक आहे.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. हणमंत सखाराम कोळी
मु.पो.ता.पाटण,जि.सातारा

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी,**
सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
कराड,जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८१/२०१०/ सातारा |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३.११.२००९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br>महादेव कोळी जमातीचे दाखले मिळणेबाबत | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. हणमंत सखाराम कोळी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व प्राधिकारी यांचा निर्णय इ.आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

## <u>आदेश</u>

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे
दि. 18 FEB 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश गोविंद गायकवाड
रूम नं.५ शिवशंभो अपार्टमेंट, नवरंग सोसायटी,
धनकवडी, पुणे -४३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८२३ /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश गोविंद गायकवाड
रूम नं.५ शिवशंभो अपार्टमेंट, नवरंग सोसायटी, धनकवडी, पुणे -४३

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.संजीव देशमुख

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३१.१२.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपले आजोबा कै.गणपत गोविंद गायकवाड हे जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयात नोकरीला होते. त्यांची जन्मतारीख आदी माहिती मिळावी,अशी मागणी आपण जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्याकडे केली होती. परंतु ती मिळाली नाही, असे निवेदन अपीलकर्ता यांचे प्रतिनिधी त्यांचे बंधू श्री.भालचंद्र गोविंद गायकवाड यांनी केले.

श्री.गायकवाड यांनी मागितलेली माहिती सन १९१८ ते १९४७ या काळातील असून त्यांचे आजोबा नेमके कोणत्या विभागात नोकरीला होते हा तपशील दिल्यास माहितीचा शोध घेता येईल, असे त्यांना विहित मुदतीत कळविले. तसेच सर्व पातळ्यांवर शोध घेऊनही कै.गायकवाड यांच्या नोकरीबाबतचा तपशील उपलब्ध झाला नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.संजीव देशमुख यांनी केले. माहिती-मागणीत नेमका तपशील नसल्याचे त्यांचे निवेदन रास्त आहे.

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६ .२.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. लक्ष्मण अनंतराव दहातोंडे
'स्वप्नाली', ५१ बी, राजगुरव कॉलनी,
तळेगाव दाभाडे, ता.मावळ,
जि. पुणे

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,**
भूमि अभिलेख, अहमदनगर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक,**
भूमि अभिलेख, श्रीगोंदा,
जि.अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९७ /२०१०/ पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक ०५/०६/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक २५/०६/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक २९/०७/२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक २६/१०/२००९ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** श्री गोंदा शहरातील मोती चौक, सि.स.नं. ६१२ च्या मालकी व मोजणीच्या अनुषंगाने माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. लक्ष्मण अनंतराव दहातोंडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत आवश्यक शुल्क (रू. २० चे मुद्रांक/ पोस्टल ऑर्डर) जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे**

दि. 23 FEB 2010

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. रणजित संपतराव जाधवराव
फ्लॅट नं. १२, बिल्डिंग डी-१६,
सुंदर गार्डन, माणिकबाग, सिंहगड रोड,
पुणे -५१

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम मंडळ, मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई -१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग, इलाखा शहर, मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई -१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२५/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४/९/२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९/९/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५/११/२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१/१२/२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>मुंबई येथील आमदार निवासासंदर्भातील माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. रणजित संपतराव जाधवराव यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत विहित शुल्क (रु २०चे मुद्रांक/पोस्टल ऑर्डर) जोडलेली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 25 FEB 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. तुकाराम भागुजी मोरे
मु. मोरेवाडी, पो. चिखली,
ता. हवेली, जि. पुणे — **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,**
भूमी अभिलेख कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार पुणे.१ — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**
भूमी अभिलेख, शिरूर, ता.शिरूर,
जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२७/२०१०/ पुणे |
| २ | **<u>मूळ अर्जासोबत मागणी केलेली माहिती :-</u>**<br>मौजे फाकटे गाव, ता.शिरूर येथील स.नं. ९६/२ च्या मोजणीसाठी पैसे भरूनदेखील मोजणी न केल्याबद्दल | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. तुकाराम भागुजी मोरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलाद्वारे केलेली मोजणी संदर्भातील मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि मोजणीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबधितांनी आयोगास सादर करून त्यांची प्रत अपीलकर्त्यास पाठवावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे

पुणे

दि 23 FEB 2010

(विजय कुवळेकर)

राज्य माहिती आयुक्त,

पुणे खंडपीठ